# उल्हासनगर महानगरपालिका

**वैद्यकिय आरोग्य विभाग**

**राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान**

---

## -: जाहिरात :-

उल्हासनगर महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य विभाग अंतर्गत राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान कार्यक्रम (NUHM) अंतर्गत खालील रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने भरण्यासाठी उल्हासनगर महानगरपालिका, **वैद्यकिय आरोग्य विभाग, उल्हासनगर- 3 येथे दर मंगळवारी दूपारी ११.०० ते १२.०० प्रमाणपत्र पडताळणी व दूपारी २.०० ते सांय. ५.०० वाजेपर्यंत मुलाखती आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तरी** पात्र व इच्छुक उमेदवारांनी **थेट मुलाखतीस (WALK IN INTERVIEW)** सर्व प्रमाणपत्राचे स्वंयसांक्षाकित एक प्रत फोटो व मुळ शैक्षणिक प्रमाणपत्रासह उपस्थित रहावे.

उल्हासनगर महानगरपालिका अंतर्गत पॉलिक्लिनिक व ना.प्रा.आ. केंद्र करिता कंत्राटी पद्धतीने खालीलप्रमाणे पदे भरावयाची आहेत. त्यांचे पदनाम, पदसंख्या शैक्षणिक अर्हता व मानधन खालीलप्रमाणे.

| अक्र | Specialist Name | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता | मानधन |
|---|---|---|---|---|
| | | **POLYCLINIC RECRUITMENT** | | |
| 1 | Physician(Medicine) | 02 | MD Medicine, DNB | **Incentive** To visit once in every week. Rs. 2000 to be paid as fixed amount per visit+ Rs. 100 per patient checked of his/her speciality to maximum Rs. 5000- visit |
| 2 | Obstetrics & Gynaecologist | 02 | MD/MS Gyn/DGO/DNB | |
| 3 | Paediatrician | 02 | MD Paed/DCH/DNB | |
| 4 | Ophthalmologist | 03 | MS Opthalmologist/DOMS | **Incentive** To visit once in every fortnight. Rs. 2000 to be paid as fixed amount per visit+ Rs. 100 per patiend checked of his/her speciality to maximum Rs. 5000/- visit. |
| 5 | Dermatologist | 03 | MD(Skin/VD) DVD,DNB | |
| 6 | Psychiatrist | 02 | MS Pyschiatrist/DPM/DNB | |
| 7 | ENT Specialist | 03 | MS ENT/DORL/DNB | |
| | **एकुण पदसंख्या** | **17** | | |
| | | **UPHC RECRUITMENT** | | |
| 1 | एपिडेमोलोजिस्ट | अराखीव - 1 | Any Medical Graduate with MPH/MHA/MBA in Health MCI/ MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | रु. ३५०००/- Per Month |
| 2 | वैद्यकिय अधिकारी **(पुर्ण वेळ) (Full Time)** | अजा - १<br>विजाअ - १<br>इ.मा.व. - १<br>ईडब्ल्युएस - १ | MBBS<br>MCI/ MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | रु. ६०,०००/- Per Month |
| 3 | वैद्यकिय अधिकारी (अर्ध **वेळ)** (Part Time) | अराखीव - ६ | MBBS<br>MCI/ MMC कौन्सिल कडील नोंदणी अनिवार्य | रु. ३०,०००/- Per Month |
| 4 | स्टाफ नर्स | विजाअ- १ | १२ th With GNM/B.sc तसेच MNC कडील नोंदणी अनिवार्य | रु. २०,०००/- Per Month |
| | **एकुण पदसंख्या** | **12** | | |

अधिक माहितीसाठी www.umc.gov.in या संकेतस्थळाला भेट द्या.

**डॉ. मोहिनी धर्मा**
**वैद्यकिय आरोग्य अधिकारी**
**उल्हासनगर महानगरपालिका**

**अटी व शर्ती :-**

१. उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपी असुन नियुक्तीचा कालावधी ११ महिने २९ दिवसांचा राहील.

२. जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसून निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागू नाही. तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही सदरची कंत्राटी पदे ही जाहिरातीत नमुद महानगरपालिकांतर्गत कार्यक्षेत्रात असतील.

३. आरक्षणाच्या पदासाठी जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे. अर्ज सोबत जात पडताळणी प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडावी.

४. अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरिक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरूध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखला झालेला नसावा.

५. उपरोक्त कंत्राटी पदांकरिता दरमहा एकत्रिम मानधन देण्यात येईल.

६. जाहिरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो याबाबतचे सर्व अधिकार मा.उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे यांनी राखून ठेवले आहेत.

७ **संगणक अर्हता-**
MSCIT प्रमाणपत्र धारण करीत असल्याचा तपशील नमूद करावा .
लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८. **थेट मुलाखतीसाठी गुणांकन पद्धती :-** एपिडेमोलोजिस्ट, पुर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी (MBBS) व अर्ध वेळ वैद्यकीय अधिकारी (MBBS), ही पदे थेट मुलाखती घेऊन भरण्याकरिता खालील गुणांकन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे.

| अक्र | विवरण | अधिकतम गुण |
|---|---|---|
| १ | **Subject Knolwledge** | १० |
| २ | **Research & Academic Knowledge** | १० |
| ३ | **Leadership Quality** | १० |
| ४ | **Administrative Ablities** | १० |
| ५ | **Experience** | १० |
| | **a) For Govt. Experience** | **2 marks for one year** |
| | **b) For private Experience** | **1 marks for one year** |
| | **एकुण गुण** | **५०** |

९. **गुणांकन पद्धती :-** जीएनएम पदांकरिता गुणांकन पद्धतीनुसार निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविण्यात येईल.

| अक्र | विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|---|
| १ | पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = ६०*५०/१००= ३०) | ५० |
| २ | पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी.) | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे २०प्रमाणे Proportion काढावे. (उदा. १. स्टाफ नर्स पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करून अतिरिक्त B.Sc (Nursing) ही शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेद्वाराने अर्ज केला असल्यास उमेद्वारास B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्यास २०% प्रमाणे Proportion = ६०*२०/१००=१२ गुण) | २० |
| ३ | संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत १ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण | ३० गुण |
| | | | **एकुण १०० गुण** |

१०) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्य क्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

११) जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्ष व मागास प्रवर्गासाठी ४३ वर्ष राहिल तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत असल्यास ५ वर्ष वयोमर्यादा शिथिल करण्यात येईल. परंतू एपिडेमोलोजिस्ट, वैद्यकिय अधिकारी (MBBS), स्पेशालिस्ट यांची सेवाप्रवेश व सेवासमाप्तीची वयोमार्यादा ७० वर्षे इतकी असून वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयांच्या उमेद्वारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून प्राप्त केलेले शारीरीकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत व कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे बंधनकारक राहिल, पुढील प्रत्येक पुर्ननियुक्तीचे वेळी सदर प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

१२) एपिडेमोलोजिस्ट, पुर्ण वेळ वैद्यकीय अधिकारी (MBBS) व अर्ध वेळ वैद्यकीय अधिकारी (MBBS), या पदासाठी शासकीय, निमशासकिय तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत असणाऱ्या अनुभवाचा विचार निवड प्रक्रियेत करण्यात येईल.

१३) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत सोईनुसार ठिकाण बदलवून मिळण्याचे मागणी करता येणार नाही.

१४) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेंत बदल करण्याचे अधिकार मा. उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ ठाणे यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत. याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.मुलाखतीकरीता उपस्थित उमेदवारांना प्रवासभत्ता अथवा इतर कुठलाही भत्ता देय राहणार नाही.

१५) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर वर्षभरात भविष्यात जर एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीवरील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.

(वरिल अटी व शर्ती पॉलिक्लीनिक करिता लागू नाहीत. )

❖ **खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जाच्या नमुन्याला जोडाव्यात.**

a. पुर्ण माहिती भरलेला फॉर्म
b. शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
c. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र ( MBBS ) Any other Medical Graduate with respective council registration (As Applicable).
d. Domicile Certificate
e. आरक्षणाच्या पदासाठी जात पडताळणी वैधता प्रमाणपत्र आवश्यक आहे.
f. शाळा सोडल्याचा दाखला/जन्मतारखेचा दाखला
g. पासपोर्ट आकाराचे २ फोटो
h. आधारकार्ड
i. अर्जदार विवाहित असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र तसेच नाव बदल असल्यास राजपत्र (Gazette)
j. शासकीय/ निमशासकीय/खाजगी संस्थामध्ये केलेल्या कामाचे अनुभव असलेस अनुभव प्रमाणपत्र.
k. लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र (प्रतिज्ञापत्र)
l. फौजदारी गुन्हा दाखल नसल्याचे हमीपत्र

**डॉ. मोहिनी धर्मा**
**वैद्यकिय आरोग्य अधिकारी**
**उल्हासनगर महानगरपालिका**